लागी छुटे ना अब तो सनम...

आम्ही काहीही म्हणा! पण आपल्या हिंदी चित्रपट प्रेक्षकांच्या रसिकतेची तऱ्हाच वेगळी! थेटरात बसून एखाद्या पैसा वसूल फाकडू गाण्यावर फिदा होऊन शिट्ट्या मारत ते अख्खं थिएटर डोक्यावर घेतील आणि बाहेर पडल्यावर त्याच चित्रपटातलं दुसरंच गाणे वर्षानुवर्षे आपल्या आठवणींच्या कोंदणात जपून ठेवतील. संगीतकार चित्रगुप्तचा 'काली टोपी लाल रुमाल' त्यातल्या श्रवणीय गाण्यांचा पुनः पुन्हा आस्वाद घेण्यासाठी तेव्हा कितीतरी वेळा पाहिला. पण प्रत्येक वेळी कुमकुमने आपला दिलखेच अदाकारीने पडद्यावर साकारलेलं 'दगा दगा वई वई...' (लता) सुरू झालं की दोन्ही कान बंद करून घ्यावे लागायचे. कारण त्या गाण्यावर थिएटरात एवढ्या शिट्ट्या मारल्या जायच्या की गाणं तर ऐकू यायचं नाहीच. पण कानाचे दडे मात्र बसायची पाळी यायची.

पुढे काळाच्या ओघात त्या गोष्टी इतिहासजमा झाल्या आणि आज त्याच चित्रपटातलं 'लागी छूटे ना...' हे रफी/लताचं विरहगीत रसिक प्रेक्षकांच्या कायमस्वरूपी लक्षात राहून गेलंय. गमतीचा भाग म्हणजे चित्रगुप्तने याच गाण्याच्या कडव्यांची चाल अवघ्या दोनच वर्षांनी 'जबक' मधल्या 'तेरी दुनिया से दूर...' मध्ये वापरून त्याच रफी/लताकडून गाऊन घेतली आणि मायबाप रसिकांनी कसलाही काथ्याकूट न करता त्या विरहगीतालाही तेवढीच मान्यता दिली. एकूणच काळाच्या कसोटीवर अशी दर्दभरी गीतेच खरी ठरतात.

ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइटच्या जमान्यात निर्माण झालेल्या 'काली टोपी लाल रुमाल' मधला रुमाल नेमका लालच रंगाचा कसा दिसू शकेल असा साधा विचारही कुणाच्या मनात न येण्याच्या काळात पाहिलेल्या या करमणूकप्रधान हलक्याफुलक्या चित्रपटात शंकर (चंद्रशेखर) आणि राजा (आगा) या दोन जिगरी दोस्तांची कथा सांगण्यात आलेली. दोघेही मुंबईच्या फुटपाथवर राहणारे. शंकर नेहमी डोक्यात काळी टोपी घालणारा. तर राजा गळ्याभोवती लाल रुमाल बांधून फिरणारा. शंकरला सिनेमात जाऊन हीरो होण्याचा ध्यास आणि राजा नंबर एकचा जुगारी.

रानी (कुमकुम) आणि जग्गू (के. एन. सिंग) हे

काली टोपी लाल रुमाल







बहीण-भाऊ. जग्गू तसा गुंड प्रवृत्तीचा खतरनाक माणूस. त्यांच्या वडिलांनी बालपणी सापडलेल्या अनाथ चंपाला (शकीला) आपल्या मुलीप्रमाणेच सांभाळलेलं. त्यामुळे रानी चंपाला आपली बहीणच समजत असते. दोघेही खेळणी वगैरे विकून उदरनिर्वाह करणाऱ्या. या दोघींची थेट शंकर आणि राजाशी होते आणि चंपा शंकरवर तर रानी राजावर फिदा होऊन एकमेकांच्या प्रेमात पडतात.

बॅनर : जनता चित्र. **निर्माता** : देवी शर्मा

दिग्द : तारा हरीश. **गीतकार** : मजरूह सुलतानपुरी

प्रदर्शन : शुक्र. ३ एप्रिल १९५९ **संगीत** : चित्रगुप्त.

कलाकार : शकीला, चंद्रशेखर, आगा, कुमकुम, के. एन. सिंग, कमल मेहरा, नैना, मास्टर परशुराम, इतर

गीते :

१) ओ काली टोपी वाले जरा नाम बता... रफी/आशा

२) यारों का प्यार लिए, नखरे हजार किए जाती है गोरी बुलाओ रे कोई... रफी/आशा

३) दीवाना आदमी को बनाती है रोटियाँ... रफी

४) लागी छूटे ना अब तो सनम, चाहे जाए जिया तेरी कसम... रफी/लता

५) गोरी ओढ के मलमल निकली कि दिल मेरा मल मल गई... रफी/लता

६) दगा दगा वई वई, हो गई, तुम से उल्फत हो गई... लता

७) जा के हम अब तो हर एक दर पे सदा देते है... लता

परंतु दुष्ट जग्गूचं चंपावर प्रेम असतं. त्यामुळे तो शंकरला पाण्यात पाहू लागतो. नेहमी हाणामारी करायला उद्युक्त असणारा जग्गू मग शंकरला बुकलून काढतो आणि पाण्यात फेकून देतो. अचेतन शंकर पाण्याच्या प्रवाहाबरोबर भलतीकडेच वाहत जातो. जखमी अवस्थेत त्याला खंडाळ्याच्या कोटकर सॅनिटोरियममध्ये दाखल करण्यात येतं. तिथं तो शुद्धीवर येतो खरा. पण डोक्याला जबरदस्त मार बसल्यामुळे तो आपलं पूर्वायुष्य विसरून जातो. त्याच दरम्यान खंडाळ्याला शूटिंगसाठी आलेला आणि हुबेहूब शंकरसारखा दिसणारा कोणी शेखर (चंद्रशेखर) नावाचा सिनेनट चित्रीकरणाच्या वेळी अपघात होऊन नेमका त्याच हॉस्पिटलमध्ये दाखल होतो आणि मृत्युमुखी पडतो. त्याला तिथे घेऊन येणारा चित्रपट निर्माता (कमल मेहरा) मग आपल्या चित्रपटाचं उर्वरित शूटिंग पूर्ण करण्यासाठी शंकरलाच शेखर बनवून आपल्या सोबत घेऊन जातो. शेखरच्या त्या चित्रपटातील हिरॉईन माला (नैना) शंकरवर शेखर समजूनच प्रेम करू लागते.

इकडे आपल्या प्रेमातील अडथळा दूर झाल्यामुळे जग्गू चंपाशी लग्न करण्याची तयारी करतो. रानीला अर्थातच ते मान्य नसते. कारण ती चंपाला आपली बहीणच समजत असल्यामुळे आपल्या वडिलांना जग्गूला समजावून सांगा असं सांगते. पण जग्गू काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतो. तो आपल्या बापालाच विहिरीत ढकलून देऊन मारून टाकतो आणि पोलीस त्याला पकडून नेतात.

आपला जिवलग मित्र बेपत्ता झाल्यामुळे बेचैन झालेला राजा मग चंपा आणि रानीच्या मदतीने त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा त्याला शंकर सिनेमात जाऊन हीरो झाल्याचं लक्षात येतं. म्हणून ते सारे त्याच्या बंगल्यावर येतात. पण स्मृतिभ्रंश झालेला शंकर त्यांना ओळखतच नाही. आपल्या मित्राला पैशाची घमेंड चढलीय म्हणून राजाही दुःखी होतो. दरम्यान आपल्या प्रियकराच्या वियोगाने चंपा आजारी पडते तेव्हा राजा तिला डॉक्टरकडे तपासण्यास नेतो. तिथेच त्याला शंकरच्या स्मृतिभ्रंशाबद्दल समजतं. शिवाय शंकरचं पुन्हा ऑपरेशन करून पूर्वस्मृती आणण्यासाठी सात-आठशे रुपयांचा खर्च येणार असल्यामुळे राजा जुगार खेळून ते पैसे जमा करतो. परिणामी राजाला पोलीस पकडून नेतात. मग चंपा आणि रानी पुरुषी वेश परिधान करून शंकरच्या बंगल्यावर नोकर म्हणून कामाला लागतात. त्याची पूर्वस्मृती जागृत व्हावी म्हणून शंकर माऊथ ऑर्गनवर वाजवीत असलेली टिपिकल धून वाजवून त्याला आधीच्या घटनांची जाणीव करून देतात. शंकर डोकं गच्च धरून वेडापिसा होऊन पुन्हा पाण्यात पडतो आणि त्याची पूर्वस्मृती जागृत होते. चंपाशी त्याचं पुन्हा मीलन होतं.

पण त्याच दरम्यान जग्गू तुरुंगातून पळून येतो आणि चंपाचं अपहरण करतो. मग मात्र चिडलेला शंकर त्याला बदडून काढतो. त्याच्या मदतीला राजाही तुरुंगातून सुटून येतो. दोघेही जग्गूची यथेच्छ धुलाई करतात. आणि त्याला पोलिसांच्या हवाली करतात. आता चंपा आणि शंकरमध्ये कुठलाही अडसर नसतो. परिणामी हे दोघे जिगरी दोस्त आपापल्या प्रेयसींसोबत सुखाने राहातात. डोक्यालां कसलाही ताप न देता निखळ करमणूक करणारा 'काली टोपी लाल रुमाल' संगीतकार चित्रगुप्तच्या गाण्यांमुळे अधिकच प्रेक्षणीय झाला होता. चित्रपटाचं शीर्षक सार्थ ठरविण्यासाठी दोन्ही नायकांची आपापल्या प्रेयसींबरोबर असणारी रफी/आशाची दोन द्वंद्वगीते गीतकार मजरूहनी किती चपखल लिहिली होती बघा. चंपा शंकरला 'ओ काली टोपीवाले जरा नाम तो बता...' म्हणते. तर राजा जेव्हा रानीला 'यारों का प्यार लिए, नखरे हजार किए जाती है शोरी बुलाओ रे कोई...' म्हणतो तेव्हा लटक्या रागाने ती उत्तरते- 'उलझे से बालवाला, लाल लाल रुमालवाला, छेडे है मोहे बचाओ रे कोई...'

अर्थात् 'लागी छूटे ना...'ची रंगत काही औरच असली तरी खऱ्या अर्थाने भाव खाऊन गेली ती 'दगा दगा वई वई...' वर बेफाम नाचणारी कुमकुम. कारण त्या आधीही 'शरारत' मध्ये 'तेरा तीर ओ बेपीर दिल के आरपार हैं' (लता) आणि 'उजाला'त 'तेरा जलवा जिसने देखा' (लता) या दोन्ही फाकडू गाण्यांवर मुख्य नायिकेपेक्षा तीच प्रभावी ठरलेली. पण इथं आपल्या रसिकांना चंद्रशेखर आणि शकीलाचं 'लागी छूटे ना...' हे दोन भागातलं विरहगीतच अधिक पसंतीस उतरलं. शेवटी पसंत अपनी अपनी, दुसरं काय!

■ विजय शिंगोर्णीकर